I/O.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सातारा  **P.S.(ठाणे):** शाहुपुरी
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0224  **Year (वर्ष):** 2024
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 14/05/2024 01:38

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** सोमवार  **Date From (दिनांक पासून):** 13/05/2024
      **Time Period (कालावधी):** पहर 5  **Date To ( दिनांक पर्यंत):** 13/05/2024
      **Time From (वेळेपासून):** 14:35 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 14:35 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 14/05/2024  **Time (वेळ):** 01:00 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 002
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 14/05/2024 01:38 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   दक्षिण, 2 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** सहाय्यक धर्मादाय आयुक्त,सार्वजनिक न्यास नोंदणी, कार्यालय, ,सातारा येथे

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): वृषाली विजय गाढवे
(b) **Guardian's Name** (पालक चे नाव) : विजय
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1996
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 63,व्यंकटपूरा पेठ, ,सातारा ,शाहुपुरी,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 63,व्यंकटपूरा पेठ, ,सातारा ,शाहुपुरी,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-8796655478

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीकष्ण दामोधरराव पाथरे | | | 1. गोलमारुती मंदीराजवळ, यादोगोपाळ पेठ ,सातारा , शाहुपुरी,सातारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

तक्रारदार हे तक्रार देणेस आलेवर दाखल.

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | एकुण 1000/ रुपये त्यामध्ये 500 रु प्रमाणे दोन नोटा. | 1,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

1,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

खबरी जबाब ता. 14/05/2024

मी, अँड वृषाली विजय गाढवे वय-28 वर्षे, शिक्षण-बी.एस.एल.एल.एल.एम.,व्यवसाय-वकिली, रा. 63,व्यंकटपूरा पेठ, सातारा मो.नं. 8796655478.

मी दि. 13/05/2024 रोजी सकाळी 09.00 वाचे सुमारास अँन्टी करप्शन ब्युरो, सातारा येथे समक्ष हजर राहून पोलीस उप अधीक्षक श्री राजेश वाघमारे यांची भेट घेवून माझ्याकडे करण्यात येणाऱ्या लाचेच्या मागणी बाबत तक्रार सांगितली की, मी माहे मार्च 2024 मध्ये पुण्याचे अँड. कदम यांचे अर्जदार कुमार राजे रास्ते यांचे श्री महाविष्णू वाई व श्री गंगारामेश्वर, वाई या ट्रस्टचे वारसा हक्काने विश्वस्त बदलाचे दोन अर्ज मा. सहायक धर्मादाय आयुक्त, सामाजिक न्यास नोंदणी कार्यालय, सातारा येथे दाखल केले आहेत. सदर केसेसचे नंबर 87/2024 व 88/2024 असे आहेत. त्यादोन्ही केसेसमध्ये मा. सहा. धर्मादाय आयुक्त यांचेकडून जाहीर नोटीस काढण्याचा आदेश दिनांक 15/04/2024 रोजी काढणेत आलेला आहे. त्यांचे त्याआदेशाप्रमाणे जाहीर नोटीसा काढणेचे काम सहा. धर्मादाय आयुक्त कार्यालयातील वरिष्ठ लिपिक एस.डी.पाथरे हे पाहत आहेत.

दिनांक 19/04/2024 रोजी त्या कामाच्या अनुषंगाने मी सहा.धर्मादाय आयुक्त, सातारा कार्यालयातील वरिष्ठ लिपिक पाथरे यांची भेट घेतली तेव्हा त्यांनी मला नोटीशीची प्रोसेस फी प्रत्येकी 290/-रु प्रमाणे भरण्यास सांगितली. त्याप्रमाणे मी 580/- रु मी भरलेले असून त्याच्या पावत्या मला मिळाल्या आहेत. मी दिनांक 23/04/2024 रोजी माझ्या कामाचे संबंधाने वरिष्ठ लिपीक पाथरे यांची भेट घेतली असता त्यांनी मला माझे अशिल श्री कुमारराजे रास्ते यांचे वाई येथील श्री गंगारामेश्वर व श्री महाविष्णु या दोन पब्लीक ट्रस्टचे वारसा हक्काने विश्वस्त बदलीचे अर्ज (चेंज रिपोर्ट) मा. सहायक धर्मादाय आयुक्त सातारा यांचे न्यायालयात दाखल असुन त्याचे प्रोसेसमधील पब्लीक नोटीस काढणेकरीता दोन्ही प्रकरणाचे प्रत्येकी 500/- रुपये प्रमाणे एकुण 1000/- रुपये लाच मागणी केलेबाबतचा तक्रारी अर्ज मी श्री. वाघमारे साहेब यांचेकडे दिला. त्याचे अवलोकन करून त्यांनी पुढील कारवाईचे नियोजन थोडक्यात सांगितले.

त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री राजेश वाघमारे साहेब यांनी लागलीच कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा यांचेकडील उपलब्ध असलेले कर्मचारी श्रीमती मनिषा सुनिल काटेकर व वैभव विश्वनाथ भिडे दोन्ही लिपिक यांची पंच म्हणुन सेवा उपलब्ध करून घेतली. त्यानंतर श्री वाघमारे साहेब यांनी दोन्ही पंच, सापळा पथकाची एकमेकांना ओळख करुन देवुन माझा सहा.धर्मादाय आयुक्त, सातारा कार्यालयातील वरिष्ठ लिपिक पाथरे यांचे विरुध्द असलेल्या लाच मागणीचे तक्रारीबाबतचा अर्ज मला व पंचांना वाचुन दाखविला. तो तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचणेस देवुन तो दोन्ही पंचानी वाचलेनंतर माझ्या तक्रारीप्रमाणे माझ्याकडे लाच मागणी झाली अगर कसे याची पडताळणी कारवाई करण्यासाठी पंच नं. 1 म्हणुन श्रीमती मनिषा काटेकर व पंच नं.2 म्हणुन श्री. वेभव भिडे हे काम करणार असल्याचे श्री वाघमारे साहेब यांनी ठरवुन सदरच्या तक्रारी अर्जावर पोउपअधीक्षक श्री वाघमारे साहेब व दोन्ही पंच यांनी सह्या करून पडताळणी कारवाईचे नियोजन केले. त्यांचे सुचनेप्रमाणे मी माझ्या सुझुकी अँक्सेस मोपेड क्रमांक एम.एच. 11 बी.ई. 1090 वरून आण्णासाहेब राजे भोसले (हत्तीखाना), शाळेच्या आवारात पंच नंबर 1 काटेकर मॅडम यांचेसह 09.30 वाचे सुमारास जावून थांबून राहिले.

तत्पुर्वी पोलीस उपअधीक्षक श्री राजेश वाघमारे यांनी पडताळणी कारवाई मा.सहा.धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालयात असल्याने मा.सहा.धर्मादाय आयुक्त यांची अनुमती घेतली व त्यानंतर 10.20 वा.चे सुमारास पोउपअधीक्षक श्री वाघमारे साहेब हे सापळा पथकासह शाळेच्या आवारात आले. त्यांनी मला पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने सुचना देवून प्रक्रिया समजावून सांगितली. तसेच मला पडताळणी कारवाई झालेनंतर लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात येण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर मपोना जाधव यांनी व्हाईस रेकॉर्डर सुरु करून माझ्या कोटच्या वरील डाव्या बाजूच्या खिशामध्ये ठेवून दिले. त्यानंतर मी व पंच नंबर 1 श्रीमती काटेकर यांचेसह 10.31 वा.चे सुमारास पायी

चालत राजधानी टॉवर्स या इमारतीमधील सहा. धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय येथे वरिष्ठ लिपिक पाथरे यांची भेट घेणेसाठी रवाना झालो. त्यावेळी पोउपअधीक्षक श्री वाघमारे साहेब हे सापळा पथकासह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा कार्यालयात परत आले.
मी व पंच असे सहा.धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सातारा येथे पोहोचलो. त्यावेळी वरिष्ठ लिपिक पाथरे हे त्यांचे टेबलवरती बसलेले होते. त्यांचेशी मी माझे कामासंदर्भाने बोलणी केली. बोलणी दरम्यान ते फी सांगितलीय त्याची असे म्हणाले, तेव्हा मी त्यांना किती रुपये विचारले असता त्यांनी मला प्रत्येकी 500/- रुपये सांगून, आणलेत का असे विचारले. तेव्हा मी त्यांना आता नाही आणले कोर्टात निघाले आहे, आणुन देते असे म्हणाले. तेव्हा ते चालतयं, लवकर या साहेब डायसवर बसायच्या आत असे म्हणून चौकशीची जाहीर नोटीस देण्यासाठी माझ्याकडे एकूण 1,000/- रु लाचेची मागणी केली. व लागलीच लाच रक्कम घेवून येण्यास सांगितली. या दरम्यान पंच नंबर 1 श्रीमती काटेकर या माझे सोबत होत्या.
त्यानंतर मी व पंच नंब 1 श्रीमती काटेकर असे परत लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, सातारा येथे 11.00 वाचे सुमारास आलो त्यावेळी मपोना जाधव यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला. मी पोउपअधीक्षक वाघमारे साहेब यांना घडलेली हकीकत सांगितली. पोउपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी व पंचांनी माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डमधील रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकून खात्री करून घेतली. त्यामध्ये सहा.धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयातील वरिष्ठ लिपिक पाथरे हे 1,000/- रु लाचेची मागणी करत असल्याची माझी, पोउपअधीक्षक वाघमारे साहेब व पंचांची खात्री झाल्याने व लाच रक्कम लागलीच स्विकारण्याची त्यांनी तयारी दर्शविल्याने लागलीच पुढील सापळा कारवाई ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,सातारा येथून करण्याचा निर्णय घेतला.
पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी मला व पंचांना सापळा कारवाईची माहिती थोडक्यात समजावून सांगितली व लागलीच सापळापूर्व कारवाईचे नियोजन केले. वेळेच्या अभावी पडताळणी पंचनामा तसेच संभाषण स्क्रिप्ट नंतर टाईप करण्यात येईल असे सांगितले. त्यानंतर मी पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांचे सांगणेवरून माझ्याकडे असलेली 1,000/- रुपये लाचेची रक्कम म्हणून पंचासमक्ष हजर केली. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक वाघमारे साहेब यांचे सहकाऱ्यांनी मी हजर केलेल्या लाचेच्या रक्कमेच्या नोटांचे नंबर एका कागदावर लिहून घेतले. व पोउपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म मला व पंचाना समजावून सांगून सापळापुर्व व सापळा कारवाईची माहिती सांगितली. त्यानुसार पोउपअधीक्षक श्री वाघमारे साहेब व त्यांच्या सहकाऱ्यांनी पंचासमक्ष सापळापुर्व पंचनाम्याची कारवाई पुर्ण केली व पोउपअधीक्षक श्री वाघमारे साहेब यांचे सुचनेप्रमाणे मपोना जाधव यांनी अंथ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम मी परिधान केलेल्या कोटमधील समोरील खालील उजव्या बाजूच्या खिशात ठेवली. वरिष्ठ लिपिक पाथरे यांना लाचेची रक्कम दिल्या नंतर डाव्या हाताने डोक्यावरून दोनदा हात फिरवून इशारा करण्याच्या सुचना पोउपअधीक्षक वाघमारे साहेब यांनी मला दिल्या.
त्यानंतर पोउपअधीक्षक श्री वाघमारे साहेब यांनी दिले सुचनेवरून मपोना जाधव यांनी माझ्या कोटच्या वरील डाव्या बाजूच्या खिशामध्ये व्हाईस रेकॉर्डर सुरु करून ठेवून दिले. मी व पंच नं.1 श्रीमती काटेकर असे माझ्या मोपेड वरून सहा. धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सातारा येथे जाणेकरीता 12.40 वा.चे सुमारास रवाना झालो. सहा. धर्मादाय आयुक्त, या कार्यालयात गेलो असता, कोर्टाचे कामकाज सुरु असल्याने मी व पंच नं.1 काटेकर मॅडम असे परत माझे मोपेड वरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालयात 13.04 वाचे सुमारास आलो. तेव्हा मपोना जाधव यांनी व्हाईस रेकॉर्डर बंद केल्यानंतर मी घडलेली हकीकत पंचासमक्ष सांगितली. त्यानंतर काही वेळाने पोउअपधीक्षक श्री वाघमारे साहेब यांनी पुन्हा सापळा कारवाई करण्याचा निर्णय घेवून कारवाईच्या अनुषंगाने सुचना दिल्या.
त्यानंतर मपोना जाधव यांनी माझ्या कोटच्या वरील डाव्या बाजूच्या खिशामध्ये पुन्हा व्हाईस रेकॉर्डर सुरु करून ठेवून दिला. मी व पंच नं.1 श्रीमती काटेकर असे माझ्या मोपेड वरून सहा. धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सातारा येथे जाणेकरीता 13.56 वा.चे सुमारास रवाना झालो. सहा. धर्मादाय आयुक्त, या कार्यालयात गेलो असता, वरिष्ठ लिपिक पाथरे यांची भेट झाली. तेव्हा त्यांनी आणलेत का? असे विचारले असता मी त्यांना होय, आणलेत, हजार रुपये आणले आहेत. तेव्हा त्यांनी द्या असे म्हणून त्यांचे टेबलचे डावे बाजूचे ड्रॉव्हर उघडून त्यामध्ये लाच रक्कम ठेवण्यास सांगितली. त्याप्रमाणे मी त्यांचे टेबलच्या डाव्या बाजूच्या ड्रॉव्हर मध्ये अँथ्रासीन पावडर लावलेली लाच रक्कम ठेवली. त्यानंतर मी बाहेर येवून सापळा पथकास दिसेल असा लाच रक्कम स्विकालेबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला. तेव्हा पोउअपधीक्षक श्री वाघमारे साहेब व सापळा पथकाने वरिष्ठ लिपिक पाथरे यांना ते बसले ठिकाणी लाचेच्या रक्कमेसह 14.45 वा.चे सुमारास ताब्यात घेतले व मपोना जाधव यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन त्यांचे ताब्यात घेतला. त्यानंतर पोउपअधीक्षक श्री वाघमारे साहेब यांनी पंचासमक्ष सापळा कारवाई दरम्यान रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकूण सापळा पंचनाम्याची पुढील कारवाई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय सातारा येथे करण्याचे निश्चित केले. त्याप्रमाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा कार्यालय या ठिकाणी सापळा पंचनाम्याची कार्यवाही पुर्ण करण्यात आली आहे.

तरी दिनांक 13/05/2024 रोजी 14.35 वाचे सुमारास लोकसेवक श्रीकृष्ण दामोधरराव पाथरे वय-56 वर्षे पद- वरिष्ठ लिपिक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सातारा यांनी माझेकडील अर्जदार यांची वारसा हक्काने विश्वस्त बदलाची दोन प्रकरणांमध्ये चौकशीची जाहीर नोटीस काढण्याकरीता एका नोटीसचे 500 रु प्रमाणे दोन नोटीसचे एकूण 1,000/- रु लाचेची मागणी स्वत:साठी करून ती लाच रक्कम सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सातारा येथे स्विकारलेने त्यांनी वैध परिश्रमीकाशिवाय अन्य पारितोषण, प्रलोभन, बक्षीस म्हणून आर्थिक फायदा मिळविला म्हणून माझी त्यांचे विरुद्ध कायदेशीर तक्रार आहे.

माझे लोकसेवक श्रीकृष्ण दामोधरराव पाथरे यांचेशी कसलेही वैयक्तिक वैर नसुन माझा त्यांचेशी कसलाही पैशाचा अर्थिक देवाण घेवाणीचा व्यवहार नाही.

माझा वरील खबरी जबाब माझे सांगणेप्रमाणे लॅपटॉपवर टंकलिखीत करण्यात आला असून तो बरोबर असल्याची खात्री करून मी त्यावर सही केली आहे.

समक्ष हा खबरी जबाब दिला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**
rajendra sadashiv sawantre(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** rajendra sadashiv sa
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

पो.स्टे.ऑफिसर
शाहपुरी पोलिस स्टेशन सातारा

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)